# बी.ए. योग

## व्दितीय वर्ष (तृतीय सत्र) शरीरशास्त्र

## गृहपाठाचे प्रश्न

प्र.१ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (१०)

१. ......मुळे धडाच्या पोकळीचे दोन भाग होतात.

अ. श्वास पटल ब. उदर पटल क. पेल्व्हीक डायफ्रॅम ड. पेरिटोनियम

२. स्निग्ध पदार्थांचे पचनानंतर.......... बनते.

अ. कोलेस्टेरॉल ब. फॅटीॲसिडस् क. चरबी ड. ग्लुकोज

३. ...........हा क्षार रक्त गोठण्यासाठी आवश्यक असतो.

अ. मॅग्नेशियम ब. पोटॅशियम क. कॅल्शियम ड. सोडियम.

४. फुफुसावरील आवरणाला........... म्हणतात.

अ. ओमेन्टम ब. प्लुरा क. पेरिटोनियम ड. पेरिकार्डियम

५. लहान आतड्यात अन्न पुढे सरकण्यासाठी......... क्रिया होते.

अ. पेरिस्टॅल्टिक ब. आकुंचनाची क. घुसळण ड. पाचक.

६. ह्रदयाच्या डाव्या बाजूला........... झडप असते.

अ. व्दिदल ब. त्रिदल क. एकदल ड. यापैकी एकही नाही.

७. रक्तातील ............पेशी संरक्षणाचे काम करतात.

अ. आर.बी.सी. ब. डब्लु.बी.सी. क. प्लेटलेट्स ड. चापट.

८. लाळेतील.............मुळे कार्बोहायड्रेटसचे पचन होते.

अ. लायपेज ब. म्युकस क. टायलिन ड. रेनिन.

९. महाधमनीतील झडपा बंद होताना ............असा आवाज होतो.

अ. लबलब ब. डपडप क. मरमर ड. वरीलपैकी एकही नाही.

१०. ...............आकुंचन पावताच रक्त फुफुसाकडे पाठवले जाते.

अ. डावी जवनिका ब. डावी कर्णिका क. उजवी जवनिका ड. उजवी कर्णिका.

प्र.२ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)    (१०)

१        फुफुस अभिसरण

२        रक्त गोठण्याची क्रिया

३        अन्नमार्गाचा आडवा छेद

४        रक्ताचे घटक.

प्र.३ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)        (२०)

१. फुफुसातील रचना सांगून श्वासोच्छवासाची क्रिया कशी घडते ते सांगा.

२. रक्तातील पेशींचे प्रकार वर्णन करा. धमनी व शीर यातील फरक लिहा.

३. पचन संस्थेची सर्व रचना लिहा.

४. हृदयाच्या उभ्या छेदाची आकृती काढून वर्णन करा.

व्दितीय वर्ष तृतीय सत्र

योग तत्वज्ञान

गृहपाठाचे प्रश्न

प्र.१योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (गुण१०)

१.जे इंद्रियांना दिसत नाही, पण ज्याने इंद्रिये पाहू शकतात ..........ते होय.

अ. ब्रम्ह ब. उमा क. पुरूष ड. क्लेश

२. पंचमहाभूत व पंचप्राण यांना........... उपनिषदांत देव म्हटले आहे.

अ. कठ ब. केन क. मुण्डक ड. ईश

३. कोणत्याही प्राण्याच्या ठिकाणी जगण्याविषयी जी उत्कट इच्छा असते तिला......... म्हणतात.

अ. राग ब. अविद्या क. अस्मिता ड. अभिनिवेश

४. तपस, स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान या तीन नियमांना मिळून ............असे म्हणतात.

अ. सांख्य योग ब. अष्टांग योग क. क्रिया योग ड. योगायोग

५. ........... वेदांच्या शेवटी येतात म्हणून त्यांना वेदांत म्हणतात.

अ. ब्राम्हणे ब. उपनिषदे क. संहिता ड. आारण्यके

६. उपनिषदांचा कल......... ब्रम्हाकडे अधिक आहे.

अ. निर्गुण ब. सगुण क. क्षर ड. अक्षर

७. शंभर प्रजापती आनंद म्हणजे एक ........... आनंद होय.

अ. बृहस्पती ब. मानुष क. ब्रम्ह ड. इंद्र

८.आत्म्याचे पाच श्लोक ही संकल्पना ......... या उपनिषदात आढळते.

अ. ऐतरेय ब. बृहदारण्यक क. माण्डुक्य ड. तैत्तिरीय

९. क्लेश आणि कर्माची भोगरूप फले यांचा ज्याला स्पर्श नाही, असा पुरूषविशेष म्हणजे.......... होय.

अ. ईश्वर ब. आत्मा क. जीव ड. प्रकृती

१०. उपनियदे व अरण्यके या भागास .......... म्हणतात.

अ. कर्मकाण्ड ब. यज्ञयाग क. ज्ञानकांड ड. तपस

प्र.२टिपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण१०)

१.उपनिषदांतील नीतीविषयक दृष्टिकोन

२.क्लेश

३.आत्म्याचे पाच कोश : तैत्तिरीय उपनिषद

४.ईश्वराचे स्वरूप

प्र.३सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) (गुण२०)

१. केनोपनिषदाच्या आधारे ब्रम्हाचे श्रेष्ठत्व सांगून आख्यायिका विशद कारा.

२. चित्ताच्या पाच भूमिका स्पष्ट करून समाधीविचार सविस्तर स्पष्ट करा.

३. विश्वाची उत्पत्ती आनंद मीमासेंच्या आधारे सविस्तर स्पष्ट करा.

४. अष्टांग योगातील आसन प्राणायाम प्रत्याहार या पायऱ्यांचे महत्व व स्वरूप सांगा.